डोंगरे यांच्या
बालामृतानें
अशक्त मुलें
सशक्त होतात

REGISTERED No. B. 3434

# अर्थ

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूली धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संस्थापक—प्रो. वा. गो. काळे ★ संपादक—श्री. वा. काळे

वर्ष १२ पुणें, बुधवार तारीख ६ मार्च १९४६ अंक १०

गेल्या वर्षांतील स्पृहणीय यश,

हाच नव्या वर्षाचे कार्याला सुमुहूर्त.

## दि सुप्रीम म्यूच्युअल ॲशुअरन्स कं. लि.

गेल्या वर्षांतील कामाचा आढावा

१. कंपनीकडे आलेले विमाअर्ज
रु. १८,८९,००० चे वर

२. कंपनीनें स्वीकारलेले विमाअर्ज
रु. १७,८०,००० चे वर

३. पूर्ण झालेलें काम
रु. १६,६९,००० चे वर

अल्पावधींत मिळविलेल्या यशाची वरील आंकडेच ग्वाही देतील.

—एजन्सीसाठीं व विम्यासाठीं चौकशी करा—

मॅनेजर,
दि सुप्रीम म्यु. अ. कं. लि.

हेड ऑफिस:—
८६६ सदाशिव पेठ, पुणें नं. २

## दि विजय टेक्स्टाइल्स लिमिटेड

—येरंडवणा, पुणें ४—

अधिकृत व विक्रीस काढलेलें भांडवल
रु. १,००,०००

भरणा झालेलें भांडवल
रु. ३४,५००

सदर भांडवल २५ रुपयांच्या २००० ऑर्डिनरी शेअर्समध्यें आणि ५० रुपयांच्या ६ टक्के दराच्या १००० प्रेफरन्स शेअर्समध्यें विभागण्यांत आलें आहे.

—मॅनेजिंग एजंटस—
महा-कवडीकर आणि कंपनी

सदर कारखान्यांत नित्योपयोगी सुती कापड तयार होतें

## —: साठे बिस्किटें :—

श्रूसबरी, ऑरेंज, फ्रॅन्सिस व फॅमिली मुंबई प्रांतांतील ग्राहकांस पूर्ववत मिळूं लागलीं. परिस्थिति अनुकूल होतांच इतर प्रांतांतील ग्राहकांसही पाठवूं शकूं.

—साठे बिस्किट कं., पुणें २

सर्व प्रांतांतील सुती, गरम व रेशमी खादीचा सुंदर संच

## खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

# विविध माहिती

### निवडणुकीनिमित्त सुट्या

मुंबई विधिमंडळाच्या निवडणुकीनिमित्त सोमवार ता. ११ मार्च व सोमवार ता. २५ मार्च हे दोन दिवस सार्वजनिक सुट्या म्हणून सरकारी गॅझेटमध्यें जाहीर करण्यांत आले आहेत.

### वातमी पट

चित्रपटगृहांतून प्रत्येक खेळाचे वेळीं १००० फूट बातमीपट दाखविलाच पाहिजे असा आतापर्यंत निर्बंध होता. मार्च महिन्यापासून असल्या चित्रपटांची लांबी १००० फूट ठरविण्यात आली आहे. सप्टेंबर १९४३ मध्यें जेव्हां हा हुकूम देण्यांत आला तेव्हां या बातमीपटांत युद्धासंबंधीं सर्व बातम्या असाव्या असा कटाक्ष होता. मार्चपासून ह्या चित्रपटद्वारें युद्धोत्तर सुधारणा दाखविण्यांत येतील.

### विश्वविद्यालयाच्या सेनेटच्या निवडणुकांस डिपॉझिटची जरूरी

मुंबई विश्वविद्यालयाच्या सेनेटच्या येत्या निवडणुकीस ७२ उमेदवार उभे राहिले, त्यांपैकीं ४५ उमेदवारांना प्रत्येकीं १० मतें सुद्धां पडलीं नाहींत. उमेदवारांनीं निवडणुकीस उभें राहाण्यापूर्वीं विश्वविद्यालयाच्या राजिस्ट्रारकडे २५० रुपये अनामत ठेवावे, असा एक ठराव सेनेटपुढें येणार आहे.

### चीनमध्यें रिक्शा बंद होणार

येत्या तीन वर्षांचे अवधींत चीनमध्यें रिक्शाचा उपयोग बंद करण्यांत यावयाचा आहे. वाहातुकीसाठीं रिक्शा वापरणें माणुसकीस सोडून असून त्यांत मनुष्यबळाचा अपव्यय आहे, असें चिनी सरकारचें मत आहे.

### भारत इं. बँकेच्या स्टाफ असोसिएशनचें स्नेह संमेलन

भारत इं. बँक लि. स्टाफ असोसिएशनचें ८ वें वार्षिक संमेलन लोणावळा येथें ता. २ व ता.३ मार्च रोजीं झालें. अध्यक्षस्थानीं बँकेचे एक डायरेक्टर, श्री. बी. बी. भाजेकर, बी. ए. बी. कॉम.एलएल. बी. हे होते. काल्यांच्या लेणींची सहल, क्रिकेट सामना, इत्यादि कार्यक्रम आखले होते. श्री. एम. के. तेरणीकर हे असोसिएशनचे चेअरमन आहेत,

### बँक ऑफ इंग्लंड

बँक ऑफ इंग्लंड १८ फेब्रुवारी रोजीं ब्रिटिश सरकारच्या मालकीची झाली.

### अमेरिकन लोकांना जास्त अन्न मिळणार

जगांतील सर्व देशामधील लोकांच्या वाटणीस चालू वर्षीं कमी अन्न येणार असलें तरी अमेरिकेंतील दर माणशीं वाटा वाढणार आहे. निर्गत वाढली, तरी सुद्धां अमेरिकन नागरिकांना १९४५ सालापेक्षां अधिक अन्न खावयास मिळणार आहे.

### अन्नाचा नाश थांबविण्यासंबंधीं सूचना

सध्यांच्या अन्नपरिस्थितींत अन्नाचा नाश थांबविण्यासाठीं व धान्य शक्य तेवढें सांचविण्यासाठीं काय करतां येईल ह्यासंबंधीं मुंबई सरकारनें जनतेकडून सूचना मागविल्या आहेत.

### अमेरिकेंतील सिनेमा प्रेक्षक

अमेरिकेंतील १६,५०० चित्रपटगृहांत गेल्या वर्षीं दर आठवड्यास ९½ कोटि प्रेक्षकांनीं सिनेमा पाहिला १९३० मधील प्रेक्षकांच्या कमाल संख्येचे मानानें ही संख्या १½ कोटींनीं कमी आहे. १९३१ मध्यें प्रेक्षकांची संख्या ७½ कोटींवर उतरली, तेव्हांपासून ती एकसारखी वाढत चालली आहे. गेल्या वर्षीं चित्रपट कंपन्यांनीं ४०० फिल्म्सवर २७ कोटि डॉलर्स खर्च केला. म्हणजे प्रत्येक फिल्मचा सरासरी खर्च २० लक्ष रुपयांवर गेला.

### रशियाची अमेरिकेकडे कर्ज-मागणी

रशियानें अमेरिकेकडे १०० कोटि डॉलर्सचें कर्ज मागितलें आहे. त्याच्या वाटाघाटी करण्यांसाठीं रशियन शिष्टमंडळास अमेरिकेनें वॉशिंग्टन येथें येण्याचें निमंत्रण केलें आहे.

### २० लक्ष टन धान्याची आयात अत्यावश्यक

येत्या चार वर्षांत हिंदुस्थानांत २० लक्ष टन धान्याची आयात झाला नाहीं, तर १९४३ चे पेक्षाहि तीव्र दुष्काळ हिंदुस्थानांत पडेल, असें सर रामस्वामी मुदलियार हे न्यू यॉर्क येथें म्हणाले. हें धान्य आम्हांस मोफत नको आहे, प्रत्येक कणाची किंमत देण्यास आम्हीं तयार आहोंत, असेंहि ते उद्‌गारले.

### इंग्लंड-फ्रान्स कराराची मुदत संपली.

गेल्या वर्षीं इंग्लंड आणि फ्रान्स ह्यांचेमध्यें आर्थिक करार झाला, त्याची मुदत वाढविण्यांत न आल्याकारणानें, तो २८ फेब्रुवारी रोजीं रद्द झाला.

### प्राप्तीवरील कराचे सुचविलेले नवे दर

| प्राप्ति (रु.) | युद्धापूर्वी (पै) | चालू दर (पै) | सुचविलेला दर (पै) |
|---|---|---|---|
| पहिले १५०० | ... | ... | ... |
| नंतरचे ३,५०० | ९ | १५ | १२ |
| नंतरचे ५,००० | १५ | २५ | २४ |
| नंतरचे ५,००० | २४ | ४२ | ४२ |
| नंतरची सर्व प्राप्ति | ३० | ५७ | ६० |

२ हजार रुपयांखालील प्राप्तीवर इनकम् टॅक्स नाहीं. सध्यां "मिळवलेल्या" उत्पन्नापैकीं एक दशांश (कमाल मर्यादा २ हजार रु.) उत्पन्नावर कर नाहीं, आतां, एक पंचमांश (कमाल मर्यादा ४ हजार रु.) उत्पन्नास कर माफी असावी, अशी फडणीसांची सूचना आहे. कंपन्यांस ५७ पै ऐवजीं ६० पै कर द्यावा लागेल. आयुर्विमा कंपन्यास ६३ पै ऐवजीं ६० पै कर पडेल. कॉर्पोरेशन टॅक्स कांहीं बाबतींत ३ आण्यांचा १ आणा करण्यांत आला आहे.

### रेल्वे नोकरांस महागाई भत्ता

हिंदी रेल्वेज आपल्या नोकरांस दरसाल १४ कोटि रुपये महागाई भत्ता देत आहेत. स्वस्त धान्याच्या दुकानांच्या द्वारां त्यांस आणखी १३ कोटि रुपयांचा फायदा होत आहे.

### युद्धकालांतील तटस्थ राष्ट्रें


स्वित्झरलंड, स्वीडन, व पोर्तुगाल हे देश युद्धकालांत तटस्थ होते. त्यांचेमध्यें ८० कोटी डॉलर्स किंमतीची जर्मन जिंदगी आहे ती संयुक्त राष्ट्रांस देण्याबद्दल अमेरिकेनें त्यांचेमागें टमणें लावलें आहे.





पंढरीनाथ
ब्रिलिअन्टाईन वापरा




पुणें चीफ एजंटस:—
मेसर्स श्री वृत्त एजन्सी,
१००, रविवार पेठ, मोती चौक, पुणें

# फडणिशी चाकें उलट दिशेनें फिरूं लागलीं

( प्रा. द. गो. कर्वे, एम्. ए. )

पुढील वर्षाचें अंदाजपत्रक हिंदी अर्थमंत्र्याचे हातून तयार होईल अशी आशा प्रदर्शित करून हिंदुस्थान सरकारचे सध्यांचे फडणीस सर आर्चिबाल्ड रॉलेंडस ह्यांनीं आगामी वर्षाकरितां जें अंदाजपत्रक मध्यवर्ती असेंब्लींत सादर केलें आहे, त्यांतील महत्त्वाच्या बाबी आजचे अंकांत इतरत्र दिल्या आहेत. १९४५-४६ सालाकरितां उत्पन्न आणि खर्च ह्यांबद्दल सर जेरेमी रैसमन ह्यांनीं जे अंदाज केले होते ते बहुंशीं यथार्थ ठरले आहेत असें दिसतें. उत्पन्नाचा अंदाज ३६२ कोटि असतां आतां ३६१ कोटि रुपये हातांत येतील अशी अपेक्षा आहे आणि खर्च ५१८ कोटि ऐवजीं ५०६ कोटि होईल असें दिसतें. युद्ध अपेक्षेपेक्षा लवकर संपलें तरीही खर्चात ह्याहून अधिक बचत झाली नाहीं हीं गोष्ट समाधानकारक आहे असें म्हणतां येणार नाहीं. अंदाजी तूट १५५ कोटींवरून १४५ कोटींवर आलेली आहे.

नव्या वर्षी उत्पन्न ३०७ कोटि होईल व खर्च ३५६ कोटि होऊन ४९ कोटींची तूट येईल असा फडणिसांचा अंदाज आहे. एकंदर अंदाजपत्रक तुटीचें असूनही उद्योगधंदेवाले आणि महागाईनें हैराण झालेले कनिष्ठ व मध्यम वर्ग ह्यांस सवलती मिळाव्या ह्याकरतां फडणिसांनीं कांहीं कांहीं कर कमी केले आहेत. युद्धकालीन नफ्यावरील कर १ एप्रिल १९४६ पासून पुढें मिळणाऱ्या उत्पन्नावर मुळींच लादला जाणार नाहीं असें फडणिसांनीं जाहीर केलें. वर वर पहाणारास ही गोष्ट धंदेवाल्यांस उपकारक आहे असें वाटण्यासारखें आहे. वास्तविक १९४५-४६ च्या धंद्याच्या उत्पन्नावर हा कर वसूल केला जाणारच आहे, आणि ४९ कोटींची तूट असतांना हा कर सर्वच्या सर्व एकदम काढून टाकून हिंदी अर्थमंत्र्याचें काम सर आर्चिबाल्ड ह्यांनीं बिकट करून ठेवलें आहे. धंदेवाल्यांसही आपल्या धंद्यांची पुनर्घटना करण्यास कर पायरी-पायरीनें उतरणें सोयीचें असतें.

राकेल आणि पेट्रोल ह्यांवरील करांत झालेल्या उतारानें गरीब आणि मध्यमवर्ग कांहींसे खुष होतील हें खरें. तरी पोष्टाचे दरही थोड्या प्रमाणांत उतरविले असते तर त्या खात्याची सांपत्तिक स्थिति न बिघडतां सामान्य लोकांस सवलत मिळाली असती. आज रेलवे खात्याप्रमाणें पोस्ट खातेंही सरकारी तिजोरींत पैसा आणीत आहे. परंतु हा त्या खात्याचा खरा उपयोग नसून लोकांस उपयुक्त होण्याच्या दृष्टीनें पोस्टाचे दर कमींत कमी असणें जरूर आहे.

१५,००० रु. खालील उत्पन्नांवर जो कर आहे त्यामध्यें योग्य सवलती फडणिसांनीं दिलेल्या आहेत. त्याचप्रमाणें कंपन्यांच्या उत्पन्नावरील सामान्य करांतही थोडा उतार केलेला आहे. धंद्यांचा कच्चा माल आणि यंत्रसामुग्री ह्यांवरील कर कमी करून अगर नाहींसे करून, त्याचप्रमाणें नव्या इमारती आणि यंत्रसामुग्री ह्यांवरील खर्चाचा बराचसा भाग घसारा म्हणून वजा घालण्याची सवलत ठेवून धंद्यांच्या पुढील वाढीस उपकारक धोरण आखल्याबद्दल फडणिसांचें अभिनंदन केलें पाहिजे.

१५,००० रु. वरील उत्पन्नावर जो कर आहे तो, आणि कंपन्यांचा नफ्यावरील कर ह्यांबद्दल जे इतर लहानसहान फरक केलेले आहेत त्यांत तत्त्वाचा नवा प्रश्न नसून दरांची जुळणी करण्याकरतां ते केलेले आहेत. नव्या करांपैकीं सोन्याच्या आयातीवर तोळ्यास २५ रु. प्रमाणें जो कर लादण्यांत आला आहे तिकडे सर्वांचें लक्ष जाणें साहजिकच आहे. हा कर हंगामी असून त्याची रकम कमी-अधिक करण्याचा सरकारनें आपल्याकडे अधिकार ठेवलेला आहे. सध्यां हिंदुस्थानांत सोन्याचा भाव आहे तो इतर देशांतील भावाहून पुष्कळच अधिक आहे. आतां परदेशांतून सोनें येऊं लागल्यास हा मधील नफा सर्व व्यापाऱ्यांचे हातीं, अगर परदेशांतील जे गट अगर सरकार इकडे सोनें पाठवितात, त्यांच्या हातीं जाऊं नये म्हणून हा कर लादलेला आहे. सोन्याच्या आयातींत वाढ होऊन भाव जसजसे उतरतील तसतसा हा कर कमी केला जाईल. एथवर फडणिसांचें धोरण ठीक आहे. परंतु सोन्याचा भावच येथें अधिक कां आहे हा मूळ प्रश्न आहे.

ह्या प्रश्नाचें उत्तर केवळ परदेशाहून येथें सोनें येत नाहीं हें नसून चलनाची वाढ येथें बेसुमार झालेली आहे हें येथील भाव इतर देशांतील भावांहून अधिक असण्याचें कारण आहे. सरकारचें चलनविषयक धोरण बदलून येथील सर्वच बाजारभाव क्रमाक्रमानें उतरून किंमती आणि मजूरी ह्यांची घडी नीट बसविल्याखेरीज सोनेबाजार किंवा इतर बाजार ह्यांमधील सट्टेबाजीस आळा बसणार नाहीं. अंदाजपत्रकांत कांहीं वर्गांस खुष करणाऱ्या कित्येक बाबी आहेत हें खरें असलें तरी पुढील आर्थिक धोरणाचा पूर्ण नकाशा ध्यानांत घेऊन तें कितपत ठरविण्यांत आलें आहे, हें चलन, स्टर्लिंग ठेवी, भावनियंत्रण इत्यादि बाबतींत सरकार आतां कोणतें धोरण अवलंबितें त्यावरून दिसून येईल.

## हिंदुस्थान सरकारचें अंदाजपत्रक-तुलनात्मक आकडे

( कोटि रुपये )

| | १९३८-३९ | १९४४-४५ दुरुस्त | १९४५-४६ अंदाज | १९४५-४६ दुरुस्त | १९४६ ४७ अंदाज |
|---|---|---|---|---|---|
| उत्पन्न | ८५.५२ | ३५६.८८ | ३६२.३४ | ३६०.६६ | ३०७.०० |
| खर्च | ८५.१५ | ५१२.६५ | ५१७.६३ | ५०५.६१ | ३५५.७१ |
| नागरी | ३८.९६ | ११५.४२ | १२३.४० | १२९.१९ | १११.९४ |
| लष्करी | ४६.१८ | ३९७.२३ | ३९४.२३ | ३७६.४२ | २४३.७७ |
| तूट | -०.६३ | १५५.७७ | १५५.२९ | १४४.९५ | ४८.७१ |

### मुसलमानांची शिपिंग कंपनी

मेमन चेंबर ऑफ कॉमर्सची साधारण सभा मुंबई येथें नुकतीच भरली होती, तिचेमध्यें एक मुस्लिम आगबोट कंपनी काढण्यासंबंधीं चर्चा झाली. मुंबईमधील सर्व प्रमुख मुसलमान व्यापाऱ्यांची सभा यासाठी बोलावण्यांत येणार आहे.

### विमा सोसायट्यांवर नियंत्रण नाहीं

विमा पॉलिसींच्या रकमेवरील नियंत्रणाची अट सहकारी विमा सोसायट्यांस लागू असूं नये, ह्या अर्थाची एक दुरुस्ती मध्यवर्ती असेंब्लीनें इन्शुअरन्स बिलांत केली आहे.

## शेअर बाजार

(श्री. व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम्., शिवाजी नगर, पुणें ५)

२८ फेब्रुवारी रोजीं हिंदुस्थानच्या फडणीसांनीं अंदाजपत्रक सादर केलें. जादा नफ्यावरील कर अजिबात रद्द करण्यांत आला त्यामुळें सटोडियांनीं अक्षरशः त्या दिवशीं व शुक्रवारीं आपल्या जिवाची मुंबई केली. डिफर्ड २९५०, डाईंग २४५०, कोहिनूर ७६०, नागपूर ५१२, सिमेंट २५६ असे पूर्वी स्वप्नांत सुद्धां भाव दिसले नसतील असे भाव प्रत्यक्ष झाले. जादा नफ्यावरील कर रद्द करून सरकार भांडवलवाल्यांनीं युद्धांत मदत केली त्याबद्दल उतराई झालें. गरीबांच्या तोंडावर पै-पैसा, केरोसीन, सुपारी, वगैरेवरील कर कमी करून तुकडा टाकण्यांत आला आहे. देशांत युद्धोत्तर योजनासंबंधींचा खुलासा अगदींच पुसट असून नवीन राष्ट्रीय सरकार येणार त्यानें काय तें बघून घ्यावें असें ध्वनित आहे. चालू लष्करी खर्च मागील सालापेक्षां कमी असला तरी २४० कोटींवर इतका मोठा आहे. शेअर बाजाराच्या दृष्टीनें महत्त्वाची योजना म्हणजे आपल्या उत्पन्नाच्या तीस टक्क्यांवर अथवा भांडवल व गंगाजळी मिळून पांच टक्क्यावर कंपन्यांनीं डिव्हिडंड वाटल्यास चढत्या प्रमाणांत कर देणेचा आहे. व जादा नफ्यापोटीं सरकारकडे ठेवी सांठल्या आहेत त्या परत केल्या तर भागीदारांना बक्षिसीरूपानें वाटण्याच्या नाहींत. त्यांचा उपयोग उद्योगवाढीकडेच केला जावा अशी योजना आहे. या दृष्टीनें कंपन्यांचीं व्याजें आहेत तीं कायम रहावींत पण जास्त देण्याचें संचालकांच्या खुषीवर अवलंबून राहील. आपल्या कंपन्यांच्या शेअर्सचे भाव वाढवावयास डायरेक्टरांच्या हातांत उत्तम कोलीत मिळालें आहे. ज्या फडणवीसांनीं सट्टेबाजी हटवण्याकरतां मोठ्या नोटा रद्द करणारा वटहुकूम काढविला त्यांनीं या अंदाजपत्रकानें सटोडियांना केवढें उत्तेजन दिलें आहे याची वरील भावच साक्ष पटवतील. आमच्या मतें गुंतविणारांनीं ऊंस गोड लागला तरी मुळासकट खावा काय? या म्हणीची सध्यां कांस धरून आणखी महिना दोन महिने तेजीवाल्यांची निशा उतरते काय याची वाट पहावी. या वेळेस भाव तेजीवाल्यांना डाईंगला ८ रु. व डिफर्डला ४। रु. यावे लागले हें ध्यानांत येण्याजोगें आहे. सोन्यावरच्या जकातीमुळें तिकडे ओहोटी लागेल त्याचा परिणाम या बाजारावर नकळत होणारच आहे.

### सोनें विक्रीपासून फायदा

हिंदी रिझर्व्ह बँकेनें १९४४ सालीं चलनविस्तारास आळा घालण्यासाठी सोनें विकण्यास प्रारंभ केला, त्यामुळें दक्षिण आफ्रिका व बँक ऑफ इंग्लंड ह्यांस चांगलाच फायदा झाला. एका औंसास १७१ शिलिंग ह्या दरानें बँक ऑफ इंग्लंड द. आफ्रिकेकडून सोनें विकत घेऊन तें हिंदुस्थानांत ३२० शिलिंगास विकत असे. ह्या व्यवहारांत होणाऱ्या नफ्यापैकी द. आफ्रिकेच्या वाट्यास सुमारें १३/४ कोटि नफा झाला. बँक ऑफ इंग्लंडला ३ कोटि रुपये नफा मिळाला असेल असा अंदाज आहे. अशा रीतीनें, हिंदुस्थानांतील परिस्थितीचा त्या दोघांस भरपूर फायदा झाला.

### बँक ऑफ इंडियाची लंडन येथें शाखा

इंग्लंडमध्ये बँकिंगचा व एक्सचेंजचा व्यवहार करण्यासाठी बँक ऑफ इंडिया लि. लंडन येथें लवकरच एक शाखा उघडणार आहे.

### जर्मन शास्त्रज्ञांची इंग्लंडमध्यें आयात

इंग्लंडनें जर्मन शास्त्रज्ञांची आयात केली आहे. त्यांचेकडून इंग्लंडला उपयुक्त होईल अशी शक्य तेवढी माहिती काढून घेण्यांत येईल.

### कापड परिस्थिति सुधारण्यास अवकाश आहे

हिंदुस्थानांतील कापडाची परिस्थिति कांहीं काळ, निदान दीड वर्ष तरी, सुधारण्याचा संभव नाहीं, असें हिंदुस्थान सरकारचे टेक्टाइल कमिशनर, श्री. धर्मवीर ह्यांनीं सांगितलें.


**हें प्रास्पेक्टस् नव्हे फक्त जाहिरात आहे.**

The consent of the Central Government has been obtained to this issue under Defence of India Rule 91 A. by an order of which a complete copy is open to public inspection at the Head Office of the Company. It must be distinctly understood that in giving this consent the Government of India do not take any responsibility of the financial soundness of any schemes or for the correctness of any of the statements made or opinions expressed with regard to them.

# दि बेळगांव बँक लि.,

(स्थापना : १९३०)

हेड ऑफिस : रविवार पेठ, बेळगांव

**एकूण खेळतें भांडवल**
रु. ४५,००,००० (पंचेचाळीस लाख)

**विक्री झालेलें भांडवल**
रु. २,५०,००० (अडीच लाख)

**नवीन विक्रीस काढलेलें भांडवल**
रु. १,००,००० (एक लाख)

नवीन विक्रीस काढलेलें भांडवल प्रत्येकीं रु. १० च्या १०,००० भागांमध्यें विभागलें असून, हे भाग प्रत्येकीं रु. २ वाढीनें विकणेंत येणार आहेत. आजपर्यंत बँकेनें दर वर्षी ६। टक्क्यापेक्षां कमी डिव्हिडंड कधींही दिलेलें नाहीं. उत्तम रीतीनें पैसे गुंतविणारास अमूल्य संधी.

शाखाः—संकेश्वर, होसूर, गोकाक, कँप (बेळगांव), वेंगुर्ला, मालवण, नंदगड, गडहिंग्लज, रामदुर्ग, चिकोडी, धारवाड, नरगुंद, चिपळूण, कणकवली, शिरोडा व निपाणी.

*—सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.—*

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. जी. एन. कुलकर्णी, चेअरमन
" एम. जी. हेरेकर, व्हाईस चेअरमन
" एल. व्ही. देशपांडे
" जी. एल. गजेंद्रगडकर
" एन. रामराव
श्री. जी. व्ही. सराफ
" ए. आर. नाईक
" जे. डब्ल्यू. कलघटगी
" एस. एम. मुनूर
" आर. आर. किणी
" एन. एस. शिराळी

एच. एस. कुलकर्णी
मॅनेजर

# स्फुट विचार

## आंतरराष्ट्रीय बँक व फंड–असेंब्लीच्या कमिटीचा रिपोर्ट

ब्रेटन वुड्स करारांचें मूळ सभासदत्व हिंदुस्थान सरकारनें पत्करलें तें योग्य केलें. अशा अर्थाचा एक ठराव फडणविसांनीं मध्यवर्ति असेंब्लींत मांडला होता त्यावर बरीच चर्चा होऊन, सर्व प्रश्नाचा विचार करून रिपोर्ट करण्यासाठीं असेंब्लीच्या नऊ सभासदांची कमिटी नेमण्याचें ठरलें. ह्या कमिटीनें बराच खल करून आपला प्राथमिक रिपोर्ट असेंब्लीस सादर केला आहे. १९४५ च्या डिसेंबरमधील अँग्लो-अमेरिकन कर्जविषयक करारांतील कोणत्याहि अटी हिंदुस्थानास बंधनकारक नाहींत, हें त्या कमिटीनें प्रारंभींच स्पष्ट केलें आहे. हिंदुस्थानाचें इंग्लंडमध्यें येणें सांठून राहिलें आहे, त्याच्या फेडीच्या व्यवस्थेबाबत ब्रिटिश सरकार हिंदुस्थान सरकारशीं वाटाघाटी करणार आहे. त्या वाटाघाटींतून काय निष्पन्न होतें, तें पाहून हिंदुस्थानानें ब्रेटनवुडस संस्थांत भाग घ्यावा किंवा नाहीं, हें ठरविणें युक्त होईल, असा कमिटीचा अभिप्राय आहे. ब्रिटिश सरकारचें म्हणणें हिंदुस्थानास समाधानकारक वाटलें नाहीं, तर आंतरराष्ट्रीय फंड व बँक ह्यांतून हिंदुस्थानास बाहेर पडणें भाग पडेल. त्याचप्रमाणें हिंद-ब्रिटन वाटाघाटी निष्कारण लांबणीवर टाकण्यांत आल्या तरी हिंदुस्थानास बाहेर पडावें लागेल. कारण स्टर्लिंग कर्जाचा समाधानकारक निर्णय लावण्यापूर्वीच ब्रेटन वुड्स करारांतील जबाबदाऱ्या हिंदुस्थानानें स्वीकारणें योग्य होणार नाहीं. इंग्लंडमधील कित्येक पुढारी व वृत्तपत्रें हिंदुस्थानच्या इंग्लंडमधील येण्यांत काट सुचवीत आहेत, त्याकारणानें हें येणें जसेंच्या तसें वसूल होतें कीं नाहीं ह्याबद्दल भीति वाटूं लागली आहे. ही भीति नष्ट करणारी व वाटाघाटीची तारीख निश्चित ठरविणारी एक घोषणा ब्रिटिश सरकारनें तात्काळ करावी, अशी असेंब्लीच्या कमिटीची सूचना आहे. कमिटीनें हिंदुस्थानाच्या ब्रेटन वुड्स संस्थांच्या सभासदत्वाबाबत आणखी पुढें विचार करीपर्यंत हिंदुस्थान सरकारनें त्यासंबंधांत पुढें पाऊल टाकूं नये व आर्थिक जबाबदाऱ्या पत्करूं नयेत, अशी स्पष्ट सूचना कमिटीनें केली आहे. असेंब्लीनें सरकारला आपले प्रतिनिधी 'गव्हर्नर' व एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर नेमण्यास अधिकार देण्यास हरकत नाहीं. आंतराष्ट्रीय फंड व बँक ह्यांच्या पहिल्या सभांत भाग घेऊन 'गव्हर्नरा'नें आपला रिपोर्ट सादर करावा. त्याचा विचार करून हिंदुस्थाननें सभासद राहावें किंवा नाहीं याबाबत योग्य तो अखेरचा निर्णय करणें असेंब्लीचे कमिटीस सोईचें पडेल असें तिचें म्हणणें आहे. कमिटीचा रिपोर्ट असेंब्लीनें मान्य केला आहे आणि सभांस हजर राहण्यासाठीं रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, सर चिंतामणराव देशमुख, हे ता. १ रोजीं कराचीहून निघाले आहेत.

---

## रिझर्व बँक कायद्यांत दुरुस्ती

हिंदुस्थानच्या इंग्लंडमधील येण्याच्या वसुलीचा प्रश्न समाधानकारकपणें निकालांत निघाल्याविना ब्रेटनवुड्स करारांचें सभासदत्व हिंदुस्थानानें पत्करूं नये असा ह्या रिपोर्टाचा सारांश आहे. हिंदी येण्यांत काट होऊं नये ह्या दृष्टीनें त्याच्या वसुलीसंबंधीं वाटाघाटी सत्वर सुरू व्हाव्यात असा कमिटीचा रास्त आग्रह आहे. इकडे येण्यांत काट सुचविली जात असतांना हिंदुस्थानचें इंग्लंडमधील येणें वाढत चाललेलें आहे. रिझर्व्ह बँक कायद्याच्या ४० व्या व ४१ व्या कलमाप्रमाणें स्टर्लिंगच्या बदली रुपये व रुपयांच्या बदली स्टर्लिंग देण्यास बँक बांधलेली आहे. त्याचा परिणाम, बँकेजवळील स्टर्लिंग रोखे वाढण्यांत होत आहे आणि स्टर्लिंग पौंडांतील शिल्लक वाढत आहे. हीं दोन्ही कलमें दुरुस्त करून रिझर्व्ह बँकेवरील चलनविस्ताराची सक्ती नष्ट करावी अशी असेंब्लीच्या कमिटीनें सूचना केली आहे; आणि ती फडणवीसांना अमान्य नाहीं, असें दिसतें. ब्रेटनवुड्स कराराच्या सभासदत्वास असेंब्लीनें मान्यता दिल्यास तीं कलमें दुरुस्त करण्याचें काम सरकार हातीं घेईल, असा रंग दिसतो. करारास मान्यता मिळविण्याची सरकारची घाई आहे. ती देण्यापूर्वी हिंदुस्थानच्या येण्याचा प्रश्न सोडविण्याचा विरोधी पक्षाचा प्रयत्न आहे.

---

## प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लि., पुणें

वार्षिक सभा : (१०-३-४६)

प्रेसिडेन्सी बँकेचें खेळतें भांडवल १९४४ अखेर ३३½ लक्ष रुपये होतें तें आतां ४९ लक्ष रुपये झालें आहे. वसूल भांडवल ४ लक्ष, ६१ हजार रुपये असून ठेवींचा आकडा सुमारें ४२½ लक्ष झाला आहे. बँकेनें सुमारें १२½ लक्ष रुपये रोख्यांत गुंतविले आहेत आणि २३ लक्ष रुपयांचीं कर्जें दिलीं आहेत. बँकेनें ९३ हजार रुपये व्याज दिलें व २ लक्ष, ३ हजार रुपये व्याज मिळविलें. कमिशन व इतर उत्पन्न १९ हजारांचें झालें. निवळ नफा ६४,४३३ रुपये उरला. त्यांतून ४% कर माफ डिव्हिडंड देण्यास १७,१०९ रुपये लागतील. २६ हजार रुपये करासाठीं राखून ठेवले आहेत आणि १९ हजार रुपये रिझर्व्हज्‌मध्यें समाविष्ट होतील. बँकेच्या मुंबई शाखेचें काम प्रगतिपर असून थोड्या अवधींत ती स्वावलंबी झाली आहे. बँकेचे अध्यक्ष श्री. ग. रा. साठे हे असून श्री. सी. टी. चितळे हे मॅनेजिंग डायरेक्टर व श्री. जी. डी. जोगळेकर, बी. ए. (ऑनर्स), बी. कॉम., एलएल. बी. हे मॅनेजर आहेत.

---

## ओगले ग्लास वर्क्स लि.

(वार्षिक सभा. १७-२-४६.)

वरील कंपनीनें १९४५ सालीं २५ लक्ष ९५ हजार रुपयांची विक्री करून ६ लक्ष ५७हजार रुपये अव्वल नफा मिळविला. खर्च, घसारा, मॅनेजिंग एजन्सी कमिशन वगैरे वजा जातां निवळ नफा २,८०,४४७ रुपये उरला. ६४,००० रुपये इंटेरिम डिव्हिडंडची रकम वजा जातां उरलेल्या रकमेंतून फायनल डिव्हिडंडला पुन: ६४,००० रुपये लागतील. प्रत्येक भागावर सबंध वर्षाचे २+२=४ रुपये होतात म्हणजे डिव्हिडंडचा दर १६% पडतो. कामगारांचे व ऑफिस स्टाफचे हुशार व होतकरू मुलांना कॉलेजमधील व परदेशांतील उच्च शास्त्रीय शिक्षणाचा लाभ घेतां यावा अशासाठीं कंपनीनें नवीन उपक्रम चालू केला असून त्याच्या फंडांत १०,००० रु. टाकले आहेत. म्हेसूर ग्लास व एनामल वर्क्स लि. बंगलोर व त्रावणकोर ओगले ग्लास मॅ. कं. लि. आलवाई, ह्यांचीं कामेंहि चांगलीं चालू आहेत. "युद्धामुळें झालेलें नुकसान भरून काढण्यासाठीं व हिंदुस्थानच्या बाजारपेठा हस्तगत करण्यासाठीं परदेशी कारखानदार देशी कारखानदारांशीं स्पर्धा करूं लागणार, हें स्पष्ट आहे. त्या परिस्थितीस यशस्वीपणें तोंड देतां यावें, म्हणून आपल्या कारखान्यानें तयारी चालविली आहे. कारखान्याचे मुख्य चालक श्री. श्री. प्र. ओगले व चीफ इंजिनिअर रा. अ. प्र. ओगले हे इंग्लंडला जाऊन तेथील निरनिराळे कारखाने पाहून व उपयुक्त अशी नवीन यंत्रसामुग्री खरेदी करून नुकतेच परत आले आहेत. नवीन व उपयुक्त बाबींचा उपक्रम आपल्या कारखान्यांत लवकरच सुरू करण्यांत येईल." अशी युद्धोत्तर कामासाठीं तजवीज कंपनीनें केली आहे.

### महाराष्ट्र बँकेची वार्षिक सभा

बँक ऑफ महाराष्ट्र लि.ची वार्षिक सभा रविवार तां. २४ रोजीं भरली होती. सेवानिवृत्त झालेल्या डायरेक्टरांपैकीं श्री. देशमुख ह्यांनीं फेरनिवडणुकीस उभें रहात नसल्याचें कळविल्याबद्दल त्यांच्या रिकाम्या झालेल्या जागीं श्री. माणिकचंद शहा ह्यांची निवडणूक झाली. ऑडिटरांचे जागीं (१) श्री. गो. द. आपटे, बी. ए., जी. डी. ए., आर. ए. व (२) श्री. द. ग. जोशी, एम. ए., ए. एस. ए. ए. (लंडन), आर. ए., ह्यांची नेमणूक करण्यांत आली. डायरेक्टरांचा अहवाल व नफा वांटणी मंजूर झाली.

### भारी किंमतीच्या किती नोटा परत आल्या ?

चलनविषयक वटहुकुमाप्रमाणें भारी किंमतीच्या ११७ कोटि, ५५ लक्ष रुपयांच्या नोटा रिझर्व्ह बँकेच्या खालील वेगवेगळ्या केंद्रांनीं बदलून दिल्या :—

| | बदलून दिलेल्या नोटा (कोटि, लक्ष रु.) |
|---|---|
| मुंबई | ५८,६५१/२ |
| कलकत्ता | ३०,४७ |
| कानपूर | ६,७९ |
| कराची | ०,३७ |
| लाहोर | १२,८४ |
| दिल्ली | ०,३६ |
| मद्रास | २,६६ |
| सुमारें | ११७,५५ |

## NOTICE TO CONTRACTORS.

Separate Sealed Item Rate Tenders on B-2 Forms are invited for the works of—(1) Special Repairs to Poona—Ahmednagar Road. (2) Special Repairs to Wadgaon—Chakan Road and (3) Improvements to culvert No. 621 in mile 105/1 of Bombay — Poona Road, estimated to cost Rs. 41,724/-, Rs. 44,459/- and Rs. 25,420/- respectively.

2. Tender forms will be issued on payment of Rs. 3/- per copy of each tender upto the 12th March and tenders received upto 3 P. M. on the 13th March, 1946.

3. Earnest money of Rs. 420/-, Rs. 445/- and Rs. 255/- should be paid separately into the Treasury and the Chalan attached to the respective tenders.

4. Further particulars can be had on application to the Executive Engineer, Poona Division.

Sd/- S. K. KARANDIKAR,
Executive Engineer,
Poona Division.

Office of the Executive Engineer,
Poona Division.
Poona, 27th February 1946.





'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार









वर्ग पुस्तकें बंद

# मुंबई शेअर बाजार

फिनलेमिल्स १६–२–४६ ते ८–३–४६
गोकाक मिल्स १–३–४६ } २१–३–४६ }
अपोलो मिल्स १–३–४६ ते २३–३–४६

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )

व्याज–वजा

कोहिनूर—२८-३-४६ अपोलो—२९-३-४६
फिनले मिल्स रु. १५ दि. १४–३–४६
कोहिनूर मिल्स } सेंट्रल बँक } २२–२–४६ ते १६–३–४६

| १९४५ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार २६।२।४६ | बुधवार २७।२।४६ | गुरुवार २८।२।४६ | शुक्रवार १।३।४६ | सोमवार ४।३।४६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६०५; १९८० | १२९–८–९ | ऑगस्ट | टाटा डिफर्ड्स | ३० | २८४७—८ | २८३०—० | २८३७—८ | २९२०—० | २९४२—८ |
| ४८०; ३७२ | २३–०–० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ४९६—० | ४९३—० | ५०२—८ | ५३१—० | ५४०—८ |
| २२२२-८; १७६३-१२ | २५–०–० † | मार्च–सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | २२२७—८ | २२२७—८ | २२४७—८ | २४५०—० | २४९२—८ |
| ७०२; ५६६ | १९–०–० † | मार्च–सप्टें. | कोहिनूर | १०० | ६८६—० | ६९२—० | ७०५—० | ७६६—० | ८३८—० |
| ६९८; ५०७ | २२–०–० | मे | स्वदेशी | १०० | ६८०—० | ६७७—० | ६७८—० | ७१५—० | ७२६—० |
| ४४३–८; ३६० | ९–०–० S | नोव्हें.–एप्रिल | नागपूर | १०० | ४५५—८ | ४६१—० | ४६३—० | ४९९—० | ५०१—० |
| ३४२–०; २७५ | १५–०–० | मार्च | फिनले | १०० | ३४०—० | ३३८—० | ३३८—८ | ३५७—० | ३९१—० |
| ३३५; २८३-८ | ५–०–० † | ऑक्टो.–एप्रिल | गोकाक | १०० | ३४०—८ | ३४०—९ | ३४३—० | ३६८—० | ३६७—० |
| ३३७; २४३ | ४–०–० † | जाने.–जुलै | सिंप्लेक्स | ५० | ३४३—० | ३४६—८ | ३५५—० | ३९०—० | ३८८—० |
| ५; ३-११-० | ०–४–० | मार्च | अपोलो | २ | ५–४—६ | ५—३—० | ५—४ | ५-१२-० | ५—८ |
| १७-१०; १३-७-० | ०–१५–० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १८—० | १८–३—६ | १८–८–६ | २०—९ | २०–१०–० |
| ३-१०; २-९ | ०–३–० | मे | ,, डिफर्ड्स | १ | ३–११–० | ३—१०–६ | ३–१०—० | ३-१५-६ | ४—२—० |
| ७९०; ६४५ | ३५–०–० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ७५७—८ | ७६५—० | ७६७—८ | ८०२—८ | ८१५—० |
| २४३–८; २०६-८ | ७–०–० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २३६—४ | २३८—० | २३८—८ | २५८—० | २६०—० |
| २५६; २१३-८ | ८–०–० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २४९—० | २४९—८ | २४९—० | २५६—० | २५७—० |
| ५९२–८; ५१०-० | ७–८–० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ६१५—० | ६१५—० | ६२२—८ | ६२७—८ | ६३५—० |
| ४३-७; ३०-१२ | १–४–० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ४४—० | ४३–१५ | ४४—२ | ४५–१४ | ४६—२ |
| | | | ३½% रोखे | १०० | १०३—३ | १०३–४–६ | १०३—८ | १०३—८ | १०३–६–६ |

सोमवार दि. ४–२–४६ पासून बाजार दुपारीं १२ ते १॥ पर्यंत चालू आहे. सोमवार, दि. २५ ला बाजार बंद होता.

सोमवार दि. ११–२–४६ चे भाव

| ३% गव्हर्मेंट लोन्स | | बँका | | वीज कंपन्या | | संकीर्ण | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९४६ | १०१–१० | बरोडा | १७०–० | आंध्रा व्हॅली | १८८०–० | अलकॉक | |
| १९५१–५४ | १०२—४ | सेंट्रल | ११६–० | बॉम्बे ट्रॅम | १५८–८ | बॉंबे स्टीम | |
| १९५७ | | इंडिया | २४३–० | टाटा हायड्रो | २२४–० | न्यू इंडिया | १०.३–४ |
| १९५९–६१ | | इंपी० | २४३७–८ | टाटा पॉवर | २०१०–० | शिवराजपुर | ६४–० |
| १९६३–६५ | १००—९ | | ६०२–८ | | | टाटा केमिकल | २३–४ |
| १९६६–६८ | | रिझर्व्ह | १५८–८ | | | टाटा ऑईल | ९८–० |
| १९७०–७५ | | युनियन | १२–२ | | | | |

सोमवार, दि. ११।३।४६ ला बाजार बंद आहे.

### प्रा. गाडगीळ प्रांतिक बँकेचे डायरेक्टर

मुंबई प्रां. सहकारी बँकेच्या के. प्रो. काळे ह्यांच्या रिकाम्या झालेल्या जागेवर प्रा. धनंजयराव गाडगीळ ह्यांची योजना करण्यांत आली असून, प्रा. गाडगीळ ह्यांनीं डायरेक्टर होण्यास मान्यता दिली आहे, असें समजतें.

### रुपयांतील चांदी कमी होणार नाहीं

अंदाजपत्रकांत चांदीवर सुचविण्यांत आलेल्या जकातीचा उद्देश, तिची हिंदुस्थानांतील किंमत जागतिक किंमतीचे बरोबर आणणें हा आहे; रुपयांतील चांदीचे प्रमाणावर त्याचा परिणाम होणार नाहीं असें, मुंबई येथील टांकसाळीचे प्रमुख हे म्हणाले.

### अन्नाच्या पार्सलांस बंदी

हिंदुस्थानांतील युरोपियन सैनिक व नागरिक आपल्या कुटुंबीयांना चांगलें अन्न मिळावें म्हणून येथून पार्सलें पाठवीत असत. हिंदुस्थानांतील अन्नपरिस्थिति इंग्लंडमधील परिस्थितीपेक्षां वाईट असल्याकारणानें, अशा पार्सलांस आतां बंदी करण्यांत आली आहे.

### सरकार आणि संतति नियमन

हिंदी लोकसंख्येच्या प्रश्नाचा विचार करतांना, संततिनियमनाची आवश्यकता व त्यासाठी सरकारची मदत, ह्यांची चर्चा भोर कमिटीनें आपल्या रिपोर्टांत केली आहे.

### दुष्काळनिवारणासाठी कमिटी

महाराष्ट्र व कर्नाटक ह्यांतील दुष्काळनिवारणास सहाय करण्यासाठी मुंबई येथें एक कमिटी स्थापन झाली आहे. सुमारें २,७६२ खेडेगांवांना मदत करावी लागेल.

### बँकांस दोन सुट्या मिळणार

सोमवार ता. ११ मार्च व सोमवार ता. २५ मार्च ह्या दोन्ही दिवशीं निवडणुकीनिमित्त सार्वजनिक सुट्या असल्याकारणानें बँका बंद रहातील.

### रेल्वेजच्या नियंत्रणाखालीं आगबोटी

आपल्या सरकारी मालकीच्या रेल्वेजच्या नियंत्रणाखालीं वहातुकीच्या आगबोटींची ये-जा चालू करण्याचा दक्षिण आफ्रिकेच्या सरकारचा विचार आहे.

### पावत्यांवरून प्रतिनिधित्व शाबीत होऊं शकत नाहीं

शेअर्सच्या पावत्यांबाबत मुंबई हायकोर्टानें नुकताच एक महत्त्वाचा निर्णय दिला आहे.

साराभाई डाह्याभाई नामक गृहस्थाचीं सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या अहमदाबाद शाखेंत दोन खातीं होतीं. एक कर्जखातें व दुसरें ओव्हरड्रॉफ्ट खातें. दोघांचे तारखेस या दोन्हीं खात्यांवरून मिळून सुमारें ६,१७,९४२ रुपये येणें होते. या रकमेच्या तारणासाठीं म्हणून साराभाईनें पुष्कळशा कंपन्यांचें बरेचसे शेअर्स किंवा शेअर्सच्या पावत्या व ट्रॅन्सफर फॉर्म्स बँकेकडे ठेवले होते. त्यांतच अरविंद मिलच्या ६३ आर्डिनरी शेअर्सच्या २० पावत्या होत्या. बँकेनें त्या वीस पावत्या मिलमध्यें हजर केल्या परंतु मिलकडून कळलें कीं त्या पावत्या पोकळ असून त्या पावत्यांत दर्शविल्याप्रमाणें शेअर्स मिलकडे ट्रॅन्सफरसाठीं आलेले नाहींत. पुढें १९३८ जूनमध्यें साराभाई मरण पावला. १९३९ डिसेंबरांत बँकेनें मिलवर दावा लावला कीं त्या वीस पावत्यांत नमूद केल्याप्रमाणें ६३ शेअर्स मिलनें बँकेला द्यावे अथवा त्यांची दर्शनी किंमत ६३००० रुपये नुकसानभरपाई द्यावी. अमदाबाद कोर्टानें बँकेचा दावा काढून टाकला तेव्हां बँकेनें मुंबई हायकोर्टाकडे अपील केलें.

बँकेचें म्हणणें असें कीं, मिलच्या कारकुनानें शेअर्सच्या पावत्या दिल्याकारणानें त्या पावत्यांप्रमाणें शेअर्स मिलकडे जमा आहेत असा आभास बँकेपुढें निर्माण झाला. शेअर्सच्या पावत्यांना अहमदाबादच्या बाजारपेठेच्या रिवाजाप्रमाणें शेअर्सचें प्रातिनिधिक स्वरूप आहे तेव्हां मिल शेअर्स देण्यास अथवा नुकसानभरपाई करण्यास बांधील आहे.

मुंबई हायकोर्टानें निर्णय दिला कीं पावत्या या शेअर्सचें प्रतिनिधित्व करूं शकणार नाहींत. पावत्या सकृद्दर्शनी एवढेंच दर्शवितात कीं शेअर्स कंपनीकडे दिले असणें संभवनीय आहे व ते शेअर्स पावतींत नमूद आलेल्या माणसाचे असूं शकतील. परंतु पावती म्हणजे कांहीं हक्कपत्र नाहीं. त्याप्रमाणें अमदाबादेंत पावत्यांना शेअर्सचे बाबतींत प्रमाणपत्र समजण्याचा रिवाज कोर्टांत शाबीत झाला नाहीं. तेव्हां शेअर्सच्या पोकळ पावत्या मिलच्या कारकुनानें कशा दिल्या त्याबाबत निर्णय देण्याची हायकोर्टास जरूर भासली नाहीं. अशा रीतीनें पावत्यांमुळें शेअर्सची मालकी सिद्ध होत नाहीं. पावत्या कांहीं शेअर्सच्या स्वामित्वाच्या प्रतिनिधि नाहींत असा स्पष्ट निर्णय कोर्टानें दिला.

### अमेरिकेंतील प्रचारावर खर्च

हिंदुस्थान सरकारनें अमेरिकेंतील आपल्या प्रचारावर खालीलप्रमाणें खर्च केलाः—

| | रु. |
|---|---|
| १९४२–४३ | ४,६२,००० |
| १९४३–४४ | ७,०८,००० |
| १९४४–४५ | ८,५९,३०० |

### टॉयलेट मालाची आयात

अमेरिका व ग्रेट ब्रिटन या देशांकडून १ कोटि, ४१ लक्ष रुपये किंमतीला टॉयलेटचा माल १९४५ मध्यें हिंदुस्थानांत आला.


ओलक ] फाफ मशिनच्या तोडीचीं [ ओलक

**ओलक** शिवण्याचीं यंत्रें

रोखीनें अगर हप्त्यानें मिळतात.

लिहा अगर भेटाः—व्ही. आर. बापट,
ओलक मशिन कं., लकडी पुलाजवळ,
लक्ष्मीरोड, पुणें नं. २

**बिनचूकच्या माहितीनें**

मोजक्या प्राप्तींत वाढत्या संसारखर्चास सहज आळा घालतां येतो

प्रत्यक्ष माहिती मोफत —— किंमत ४ आणे

—धी बॉम्बे जनरल एजन्सी—
भायखळा पुल, मुंबई नं. १७.

—— : स्टॉकिस्ट पाहिजेत : ——


**पैसा आणि ज्ञान वाढवा !**

श्रीमंत कसें व्हावें?—संपत्तीचा सुंदर मार्गदर्शक ! हें भाग्यवर्धक पुस्तक हजारों रु. मिळवून देईल ! किं. १॥ रु., यशाचा सूर्योदय—व्यापार उद्योगधंद्यांत नक्की यश कसें मिळवावें तें शिकवितें. किं. १॥ रु., काम आणि कामिनी—नैसर्गिक काम सौख्याचें सुंदर विवेचन करतें. किं. १॥ रु., मृत्युलोकचा प्रवास—अद्भुत कथानक ! किं. १ रु.

—आजच लिहा—

मेसर्स—विपट आणि मंडळी,
पो० कराड, जि. सातारा.

**पेडणेकर आणि कंपनी लि.,**



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी
१७२ गिरगांव रोड, मुंबई.
फोन नं. २७३८२

लहान मुलांकरितां **आर्को** गोड —एरंडेल— वापरा

: लक्ष्मी एजन्सी :
मंगळवार पेठ, कोल्हापूर


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविवास, ८२३, शिवाजी नगर, ( पो ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.